वर्ष : ०५ | अंक: १४ | मुंबई, मंगळवार २६ फेब्रुवारी २०१९ ते ४ मार्च २०१९ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 राणीबाग विस्तारी-करणाला मान्यता

3 → साळसूद इम्रान यांचे ढोंग

आरक्षणाचा अधिकार राज्य सरकारांना नाही ← 4

# कलम ३५अ




# काश्मीरमध्ये इतर भारतीय मालमत्ता विकत घेऊ शकत नाहीत

**श्रीनगर- काश्मीर संदर्भातील कलम ३५अ रद्द करण्यात यावं, या मागणीच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायलयात आज सुनावणी होणार आहे. कलम ३७० अंतर्गत येणाऱ्या कलम ३५अमुळे काश्मीरला विशेष दर्जा प्राप्त आहे. १४ फेब्रुवारीला पुलवामामध्ये झालेल्या हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये तणाव असल्याने या सुनावणीला विशेष महत्त्व आलं आहे. या प्रश्नी केंद्र सरकार सुप्रीम कोर्टात काय भूमिका मांडतं, याकडे देशाचं विशेष करून लक्ष लागलेलं आहे.**

दरम्यान, काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारने काश्मिरात २० हजार अतिरिक्त जवान तैनात केले असून खोऱ्यातील काही फुटीरतावादी नेत्यांना अटकही करण्यात आली आहे. तेव्हापासून काश्मीरमध्ये अफवांना ऊत आलं असून खोऱ्यात तणावपूर्ण शांतता आहे.

'We The Citizens' या दिल्लीच्या स्वयंसेवी संस्थेनं कलम ३५अ विरोधात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली आहे. कलम ३५अ आणि कलम ३७० यांमुळे काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा मिळाला आहे, पण यामुळे देशाच्या अन्य नागरिकांसोबत भेदभाव होतोय, असा युक्तिवाद या याचिकेत करण्यात आला आहे. २०१० सालचे UPSC टॉपर शाह फैझल यांच्यानुसार, 'कलम ३५अ एखाद्या निकाहनाम्यासारखं आहे. विवाहाचा करारच मोडीत काढला तर एकमेकांमध्ये तडजोड करून लग्न टिकवण्याची शक्यताच राहत नाही. त्यामुळे कलम ३५अ रद्द केलं तर जम्मू-काश्मीरचे भारतासोबतचे संबंधच संपुष्टात येतील.' फैझल सांगतात की, 'कलम ३५अ ही भारतीय राज्यघटनेनं जम्मू-काश्मीरसाठी केलेली विशेष तरतूद आहे. ही केवळ त्या प्रदेशासाठी केलेली व्यवस्था आहे आणि त्यामुळे भारताच्या अखंडतेला आणि एकात्मतेला आव्हान दिलं जाऊ शकत नाही.' शाह फैजल यांनी काही दिवसांपूर्वी नोकरीचा राजीनामा देऊन राजकारणात प्रवेश करणार असल्याचं जाहीर केलं होतं. पण मग कलम ३५अ वर होणाऱ्या सुनावणीमुळं काश्मीर खोऱ्यात तणाव का आहे? आणि काश्मीरमधील सर्व राजकीय पक्ष या याचिकेला विरोध का आहे?

**कलम ३५अ आहे तरी काय?**

घटनेतील कलम ३५अ अन्वये जम्मू-काश्मीरमधील मूळ रहिवाशांना काही विशेष अधिकार देण्यात आले आहेत. या कलमान्वये जम्मू-काश्मीर बाहेरच्या लोकांना जम्मू-काश्मीरमध्ये कोणतीही स्थावर मालमत्ता खरेदी करत येत नाही. तसंच बाहेरच्या लोकांना राज्य सरकारच्या कोणत्याही योजनांचा लाभ मिळत नाही किंवा त्यांना तिथे राज्य सरकारची कोणती नोकरीही मिळू शकत नाही.




## यंदा दुष्काळाची शक्यता नाही, 'स्कायमेट'चा अंदाज



**मुंबई-** देशातील शेतकऱ्यांसाठी खूशखबर आहे. सलग तिसऱ्या वर्षी मान्सून सामान्य राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामानाची माहिती देणारी खासगी संस्था स्कायमेटच्या मते, यंदा दुष्काळ पडण्याची शक्यता खूपच कमी आहे. जून-जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान चांगला पाऊस पडण्याची ५० टक्क्यांहून अधिक शक्यता आहे. मागील वर्षी २०१८ मध्ये जुलै-सप्टेंबरपर्यंत मान्सूनच्या अखेरीस पाऊस सरासरी ९१ टक्के राहिली. जो हवामान विभागाच्या ९७ टक्क्यांच्या अंदाजाच्या तुलनेत कमी होता. असे सलग पाचव्या वर्षी झाले, जेव्हा हवामान विभागाने अधिक पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

स्कायमेटच्या मते, वर्ष २०१९ मध्ये मान्सून हंगामात पाऊस सामान्य असण्याची शक्यता ५० टक्क्यांहून अधिक आहे. यंदा अल निनोची संधी खूप कमी आहे. स्कायमेटचा पहिला हवामान अंदाज १ एप्रिलला प्रसिद्ध होईल. ५ वर्षांत २०१५ मध्ये सर्वाधिक कमजोर मान्सून राहिला. त्यावेळी १४ टक्के कमी पाऊस झाला. ९६ टक्के ते १०४ टक्क्यादरम्यानचा पाऊस हा सामान्य मानला जातो.

## मराठीत बोलण्याचा आग्रह केल्याने कुरियर बॉयचा बहिणींवर हल्ला

**मुंबई-** मराठीतून बोलण्यास सांगितल्याचा राग आल्याने एका कुरियर बॉयने महिलेला शिवीगाळ करत तिच्या डोक्यात फटका मारला. एवढेच नाही तर तिच्या मदतीसाठी आलेल्या बहिणीच्या गालात पेन खुपसला. हा प्रकार दादरमध्ये शुक्रवारी घडला. याप्रकरणी पोलिसांनी कुरियर बॉयला अटक केली आहे.



इब्राहिम सामिजुद्दीन शेख (वय २८) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सुजाता पेडणेकर यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुजाता पेडणेकर या दादर येथील न. चिं. केळकर रस्ता परिसरात राहण्यास आहेत. त्यांच्या वृद्ध आई आणि दोन भावंडांसह त्या तेथे राहतात. शुक्रवारी कुरियर बॉय शेख दुपारच्या सुमारास त्यांच्या घरी कुरियर घेऊन आला. त्याला पेडणेकर यांनी कोणते कुरियर आणले अशी विचारणा केली. त्यावेळी त्याने समर्थ व्यायाम मंदिर का पुस्तक लेके आया हूम असे त्यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी त्याला मराठीत बोलण्यास सांगितले. त्यावर तो मैं हिंदूस्थानी हूं और महाराष्ट्र हिंदूस्थान में है असं म्हणाला. परंतु त्याच्याकडे पेडणेकर यांनी मराठीत बोलण्याचा आग्रह धरला. याचा त्याला राग आला. त्याने पेडणेकर यांना शिवी दिली. त्यानंतर पेडणेकर यांची बहिण विनीता यांना त्यांनी बोलवले. त्यांना प्रकार सांगितला. कुरियर घेण्यास त्यांनी विरोध केला आणि त्याचा फोटो काढून त्याच्या मालकाला दाखविण्याची धमकी त्यांनी दिली. याचवेळी त्याला राग आल्याने त्याने वाद घालण्यास सुरुवात केली. या वादात त्याने पेडणेकर यांच्या डोक्यात फटका मारला. त्यानंतर विनिता मदतीसाठी पुढे आल्या त्यावेळी हातातील पेनच विनिता यांच्या गालात पेन खुपसला. त्यात त्या जखमी झाला. त्यांनी आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. त्यावेळी शेजारचे लोक जमा झाले. त्यांच्यापैकी एका नोकराने शेखला पकडले. त्यानतंर पोलिसांना पाचारण करण्यात आले. त्यांनी शेखला अटक केली.

## काश्मीरमध्ये हालचालींना वेग; यासिन मलिकला अटक

**श्रीनगर-** पुलवामातील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारनं जम्मू-काश्मीरमधील फुटीरतावादी नेत्यांना चाप लावण्याची भूमिका घेतली आहे. फुटीरतावाद्यांची सरकारी सुरक्षा काढून घेतल्यानंतर आता थेट कारवाईला सुरुवात केली असून जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंटचा नेता यासिन मलिक याला अटक करण्यात आली आहे.



काश्मीरमधील फुटीरतावादी नेते खुलेआम पाकिस्तान सरकारशी संपर्कात असल्याचं अनेकदा समोर आलं आहे. काश्मीरमध्ये होणाऱ्या हिंसक घटनांनाही त्यांची चिथावणी असते. पुलवामा हल्ल्यानंतर भारत सरकारनं त्यांच्या बाबतीत कठोर धोरण अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वीच सरकारनं १८ फुटीरतावादी नेत्यांची सुरक्षा काढून घेतली होती. यासिन मलिकचाही यात समावेश होता. यानंतर शुक्रवारी रात्री त्याला अटक करण्यात आली.

कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून राज्यातील पोलीस व निमलष्करी दलाला अतिदक्षतेचे आदेश देण्यात आले आहेत. जम्मू-काश्मीरच्या विशेष दर्जाशी संबंधित राज्यघटनेतील अनुच्छेद ३५ वर पुढील काही दिवसांत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून ही कारवाई करण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते.

## निवडून या आणि मंत्रिपद घेवून जा

### रामदास आठवलेंची कार्यकर्त्यांना खुली ऑफर

**पुणे:** आमच्याकडे निवडून येणारे नेते नाहीत त्यामुळे मंत्रीपद देखील नाहीत. जर कार्यकर्ते निवडून आले तर त्यांना आमच्या कोट्या मधून मंत्रीपद मिळू शकते. त्यामुळे ज्या कार्यकर्त्यांना मंत्रीपद हवे आहे त्यांनी प्रथम निवडून या आणि मग मंत्रीपद घेवून जा अशी खुली ऑफर केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी कार्यकर्त्यांना दिली आहे. पुण्यामध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी रामदास आठवले म्हणाले की, शिवसेना भाजप युती झाली ही आनंदाची बाब आहे आम्ही स्वतः या युती साठी प्रयत्नशील राहिलो पण आम्हाला सोडून युती करा अस आम्ही म्हणालो नव्हतो. गेली साडेचार वर्ष शिवसेना भाजप विरोधात वक्तव्य करीत आहे तरी देखील आपण त्यांना जवळ केलत



पण आम्हाला बाजूला काढलत असा टोला आठवलेंनी भाजपला यावेळी मारला. आठवले पुढे म्हणाले की, आगामी लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपाईचा पिंपरीत मेळावा होणार आहे. या मेळाव्यात आमची ताकद दाखवून देऊ. तसेच महादेव जानकार, सदाभाऊ खोत, यांची बैठक उद्या जाणकारांच्या घरी होणार असून आम्हाला न्याय द्या या मागणीसाठी अमित शहा यांची देखील भेट घेणार आहोत असल्याच आठवलेंनी यावेळी सांगितले.

## पारंपारिक उद्योगांपैकी ७०% उद्योग पुढील १० वर्षात बंद पडतील

**मुंबई-** जगभरामध्ये टेक्नॉलॉजी, बाजारपेठेचे स्वरूप, संशोधन, ग्राहकांचा माइंडसेट इतक्या वेगाने बदलत आहे की आज चालणारा उद्योग, प्रॉडक्ट, ब्रँड उद्या चालेल का? हे सांगू शकत नाही. तरी कोणालाही कोणतातरी उद्योग पुढील काही दशके चालेल व करा, असा सल्ला देत नाही. तीन ते पाच वर्षात झटपट धंदा करा किंवा पैसे कमवा, पुढील जगात काय होईल सांगता येत नाही.
ब्लॅकबेरी, नोकिया, राजदूत गाडी, अँबेसिडर, लँडलाईन फोन, एसएमएस, ऑरकुट, रेडिफ/याहू मेल, सीडी, कॅसेट, टाईप राईटर अशी शेकडो उत्पादन बंद झाली, कारण ती काळानुसार बदलली नाहीत.

अंदाजानुसार येत्या १० वर्षात काय बदल होतील? पूर्णवेळ कार्यालये पध्दत बंद होईल. त्यामुळे कमर्शियल कॉम्प्लेक्स मॉलप्रमाणेच बंद होतील. फुड होम डिलिव्हरी वाढेल व रेस्टॉरंटचा धंदा ६०% कमी होईल, ब्युटीपार्लर ही घरपोच सेवा होईल. घरपोच ऑनलाईन हेल्थ सेवा सुरू होणाऱ्या कंपन्या निघतील व मोठी फी घेणारे डॉक्टर व टोलेजंग हॉस्पिटलचे दिवाळं निघेल. शिक्षण ऑनलाईन होईल. भव्य मारती असणाऱ्या शिक्षण संस्था खंडर बनतील. त्यामुळे बहुसंख्य शिक्षकांच्या नोकऱ्या जातील किंवा कित्येक महिने पगारच मिळणार नाहीत. कोचिंगची पध्दती पूर्ण बदलून ती ऑनलाईन होईल.



प्रायव्हेट ट्यूटर व इन्ट्रक्टर यांचे काम खूप वाढेल. शॉर्ट व कमी खर्चातील व उपयोगी शिक्षणाला महत्व येईल. सर्व राजकीय प्रचारप्रसार ऑनलाईनच असेल, रस्त्यावर भाषण, सभा, आंदोलने, मोर्चे इत्यादी मागास व खुळे समजले जातील. लोकांना उल्लू बनवायचा धंदा बंद होईल. बँकाचे सर्व व्यवहार मोबाईलवर होतील. तुम्हाला केव्हाही बँकेत जाण्याची गरज पडणार नाही. मागास, सहकारी बँका पूर्ण बंद होतील. चित्रपट हे मल्टिप्लेक्समध्ये पाहणे खूप कमी होईल. नवीन चित्रपटसुध्दा ऑनलाईन रिलीज होतील. टीव्ही पाहणे कमी होऊन सर्वजण मोबाईलवरच पाहतील. त्यामुळे टीव्ही चॅनेल तोट्यात जाऊन बरीच चॅनेल बंद होतील. जात, धर्म, वंश ह्या संकल्पना १० वर्षात संपतील, पैसा व गुण ह्या आधारेच विवाह ठरतील. फक्त पैसे कमविणाऱ्याचेच विवाह ठरतील बाकीचे वरातीत नाचायला व गणपती मिरवणुकीलाच कामी येतील. नोकऱ्या हा प्रकार झपाट्याने कमी होईल, फक्त प्रोफेशनल असतील. ९०% कंपन्या आपली कामे आऊटसोर्स करतील, ह्या धंद्याला चांगले दिवस येतील. ९०% पेट्रोल, डिझेल गाड्या बंद होतील. हे पुढील १०-१५ वर्षात नक्कीच घडेल.

# शिवडीच्या समुद्रात उद्याने ; १०० हेक्टर क्षेत्रात भराव टाकणार

**मुंबई–** 'मुंबई पोर्ट ट्रस्ट'तर्फे (बीपीटी) शिवडीनजीक च्या समुद्रात १०० हेक्टर क्षेत्रात भराव टाकून उभारण्यात येणाऱ्या 'सेन्ट्रल पार्क'वर विविध देशांची संस्कृती दर्शवणारी उद्याने तयार करण्याचा प्रस्ताव आखण्यात आला आहे. हा प्रस्ताव प्राथमिक अवस्थेत असून उद्याने उभारण्यासाठी 'केंद्रीय परराष्ट्र मंत्रालया'च्या मदतीने बीपीटी प्रशासन विविध देशांना आमंत्रित करणार आहे. 'पूर्व सागरतट विकास प्रकल्प'अंतर्गत (ईस्टन वॉटरफ्रन्ट) बीपीटी प्रशासन शिवडीच्या समुद्रात १४६ हेक्टर इतका भराव टाकून 'सेन्ट्रल पार्क' उभारणार आहे. 'ईस्टर्न वॉटरफ्रन्ट' प्रकल्पाचा विकास आराखडा तयार झाला असून प्रशासनाने तो जाहीर केला आहे. यामध्ये पूर्व किनारपट्टीच्या २८ किमीच्या पट्ट्यामधील ९६६.३० हेक्टर परिसराचा नागरी मनोरंजन, व्यापार आणि व्यावसायिक अंगाने विकास करण्यात येईल. प्रक ल्पांतर्गत शिवडी आणि कॉटनग्रीन येथील १४६ हेक्टर क्षेत्रावर पार्क आणि उद्याने तयार करण्याचा प्रस्ताव आहे. ज्यासाठी जमिनीवरील १२८ एकरचे क्षेत्र वापरण्यात येईल. तर उर्वरित २३३ एकर क्षेत्रासाठी 'हे' बंदर आणि 'हाजी' बंदर दरम्यान असणाऱ्या समुद्रात भराव टाकला जाईल. भरावाच्या परवानगीसाठी हा प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार आहे. समुद्रात ९४ हेक्टर क्षेत्रावर भराव टाकून तयार करण्यात




येणाऱ्या जमिनीवर विविध देशांच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारी उद्याने तयार करण्यात येणार आहेत. त्यासंबंधीचा प्राथमिक प्रस्ताव बीपीटीने तयार केला आहे. ही उद्याने तयार करण्यासाठी १८ देशांना आमंत्रित करण्यात येणार असल्याची माहिती बीपीटीचे अध्यक्ष संजय भाटिया यांनी दिली. प्रस्ताव प्राथमिक अवस्थेत असून या प्रस्तावाला मूर्त स्वरूप देण्यामध्ये केंद्रीय परराष्ट्र मंत्रालय महत्वाची भूमिका बजावणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी लवकरच मंत्रालयाला पत्र पाठविणार असल्याचे ते म्हणाले. विशेष म्हणजे जो देश स्वत:चे उद्यान या भूभागावर तयार करेल.

# राणीबागेच्या विस्तारीकरणाला मान्यता

**मुंबई-** भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालयाचे आधुनिकीकरण आणि विस्तार प्रकल्पाच्या बृहत् आराखड्यास केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या तांत्रिक समितीने अलीकडेच अंतिम मंजुरी दिली असून प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यातील कामास लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

राणीबागेच्या आधुनिकीकरण प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये प्राणिसंग्रहालयाचा विस्तार करण्यात येत असून पालिकेने अलीकडेच संपादित केलेल्या सुमारे १२ एकर भूखंडावर विदेशी प्रजातीच्या प्राण्यांसाठी विविध सुविधा विकसित करण्यात येणार आहे. पालिकेने प्राणिसंग्रहालयाच्या विस्तारासाठी आधुनिकीकरण प्रकल्पाचे बृहत् आराखडे नोव्हेंबर २०१८ मध्ये नवी दिल्ली येथील केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाला सादर केले होते. केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या तांत्रिक समितीने विदेशी प्रजातीच्या प्राण्यांसाठी सुविधा विकसित करण्याबाबतच्या बृहत् आराखड्यास १२ फेब्रुवारी रोजी मान्यता दिली. प्राधिकरणाकडून



मिळालेल्या मान्यतेमुळे आता विदेशी प्रजातीच्या प्राण्यांसाठी जलदगतीने सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जग्वार, चित्ता, पांढरा सिंह, झेब्रा, मँड्रिल मंकी, शहामृग, चिंपांझी अशा प्राण्यांसाठी पिंजरे, आवासस्थाने विकसित करण्यात येणार आहेत. या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर येत्या मे महिन्यापासून कामाला सुरुवात होण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. राणीबागेच्या नूतनीकरणाच्या पहिल्या टप्प्यात एन्ट्री प्लाझा, प्राणी रुग्णालय, क्वारंटाईन एरिया व किचन, अंतर्गत हरित बागा, अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण, पुरातन वास्तू जतन व संवर्धन आदी विकास कामे करण्यात आली आहेत.

# मागास दाखवून आरक्षणाचा अट्टहास का?

**मुंबई-** आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये मराठा समजाचे प्रमाण सर्वाधिक आहे किंवा ८५ टक्के मराठा समाज मागास आहे, ही बाब मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी अपवादात्मक म्हणता येऊ शकते का? मंडल आयोगानंतर एवढ्या वर्षांनी मराठा समाजाला मागास दाखवून आरक्षण देण्याचा अट्टहास



का? असे प्रश्न आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांनी गुरुवारी उपस्थित केले. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवर नेणे हे समानतेचा अधिकार हिरावून घेण्यासारखे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही हे स्पष्ट केले होते. असे असतानाही सरकारी नोकऱ्यांमध्ये योग्य ते प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि शैक्षणिक क्षेत्रात पुढे असलेल्या मराठा समाजाला आत्महत्यांची संख्या आणि सामाजिक-शैक्षणिक मागासलेपणाच्या चुकीच्या, अविश्वासार्ह माहितीच्या आधारे अपवादात्मक स्थिती म्हणून १६ टक्के आरक्षण देऊन राज्य सरकारने समानतेच्या तत्त्वाला सुरुंग लावल्याचा दावा याचिकाकर्ते संजीत शुक्ला यांच्या वतीने ॲड्. प्रदीप संचेती यांनी केला. त्यांनी निवृत्त न्या. एम. जी. गायकवाड आयोगापुढे सादर केलेल्या माहितीचाच दाखला देत राज्य सरकारचा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय कसा चुकीचा, घटनाबाह्य असल्याचेही न्यायालयाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. आतापर्यंत खुल्या प्रवर्गासाठी ४८ टक्के राखीव होते. याच खुल्या वर्गात मोडणाऱ्या मराठा समाजाला सरकारी नोकऱ्यांमध्ये १९ टक्के जागा देण्यात आल्या होत्या. खुल्या वर्गातील इतर समाजांच्या तुलनेत ही टक्केवारी ३४ किंवा ३५ टक्क्यांच्या जवळपास असून सरकारी नोकऱ्यांतील हे प्रमाण सर्वाधिक आहे.

# उत्सवांतील दणदणाट : कायदा-सुव्यवस्थेची सबब देता कशी?

**मुंबई-** कायदा-सुव्यवस्थेची घडी नीट बसवण्याची जबाबदारी असलेले पोलीस धार्मिक भावना दुखावतील आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल ही सबब देऊन कारवाईबाबत हतबलता व्यक्तच कशी करतात? असा संतप्त सवाल उच्च न्यायालयाने बुधवारी केला. तसेच पोलिसांच्या भूमिकेबाबत विशेषत: कारवाई न करण्याबाबत पोलीस आयुक्तांनीच आता प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्टीकरण द्यावे. एवढेच नव्हे, तर कारवाई न करणाऱ्या पोलिसांवर काय बडगा उगारणार याबाबतही खुलासा करावा, असे आदेश न्यायालयाने दिले. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे सांगत गेले वर्षभर ध्वनी प्रदूषण नियम धाब्यावर बसवणाऱ्यांवर कारवाई केली नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. पोलिसांच्या या भूमिकेचा न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती अजय गडकरी यांच्या खंडपीठाने बुधवारी खरपूस समाचार घेतला. गणेश विसर्जनाच्या वेळीही चौपाटीवर रात्री उशिरापर्यंत राजकीय पक्षांशी संबंधित मंडळांकडून ध्वनी प्रदूषणाचे नियम पायदळी तुडवण्यात आल्याची बाब याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्या वेळीही



कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून कारवाई न केल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले होते. त्यानंतर नोव्हेंबर २०१८ मध्ये खार आणि सांताक्रुझ परिसरातून ईद-ए-मिलादच्या मिरवणुकीदरम्यान ध्वनी प्रदुषणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याची तक्रार पोलिसांत केली होती. मात्र त्यानंतरही पोलिसांनी कारवाई केली नाही, ही बाब 'आवाज फाऊंडेशन'च्या वतीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. त्याची दखल घेत न्यायालयाने संबंधित आयपीएस अधिकाऱ्याला प्रकरणी उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले होते. बुधवारच्या सुनावणीत वरिष्ठ पोलीस अधिकारी मंजुनाथ शिंगे यांनी प्रतिज्ञापत्र सादर करत दोन्ही ठिकाणी कायदा-सुव्यवस्थेच्या कारणास्तव कारवाई केली नसल्याचे न्यायालयाला सांगितले. वारंवार कारवाई न करण्यासाठी पोलिसांकडून देणाऱ्या या सबबीबाबत न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. कायदा सुव्यवस्थेची घडी नीट ठेवण्याची जबाबदारी पार पाडणारे पोलीस ही सबब देऊच कशी शकतात? हतबल असल्याचा दावा करून आणि कायदा-सुव्यवस्थेच्या नावाखाली पोलीस कारवाई करणे टाळू शकतात का? असा संतप्त सवाल न्यायालयाने केला.

# समुद्रातील खनिज तेलसाठ्यांच्या सर्व्हेमुळे मासेमारीला उतरती कळा

**मुंबई- मुंबईलगतच्या समुद्रामध्ये खनिज तेलसाठ्याच्या सर्व्हेक्षणामुळे मच्छिमार बांधवाना प्रवेश नाकारला जातो. त्यामुळे मासेमारी व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. मच्छीमारांचा 'मासेमारी गोल्डन बेल्ट' हा भाग खनिज तेलामध्ये सामाविष्ट झाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. खनिज तेल कंपन्या या चुकीच्या पध्दतीने काम करत असल्याचा आरोप मच्छिमारांच्या संघटनेने केला आहे.**



अरबी समुद्रात ९०० खनिज तेलाच्या विहिरी खोदण्यात आल्या आहेत. डहाणू, पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड इथपर्यंत मोठ्या प्रमाणात खनिज तेल सापडते. खनिज तेलाचा सर्व्हे करताना समुद्रात मोठा स्फोट केला जातो. या स्फोटाचा आवाज हा जेट इंजिनाच्या एक लाख पटीपेक्षा जास्त असतो. स्फोट घडून आणल्यानंतर तीन किलोमीटरच्या परिसरामध्ये माशांचे थर पडतात. यात डॉल्फिन आणि व्हेल सारख्या माशांचा समावेश असतो. त्यामुळे मच्छिमारांच्या व्यवसायांना उतरती कळा लागली आहे. मागील ४० वर्षांपासून मच्छिमारांना फंड मिळत नाही. मच्छिमारांचे भवितव्य अंधारात असल्याचे अखिल महाराष्ट्र मच्छीमार समितीचे अध्यक्ष दामोदर तांडेल यांनी सांगितले. सेसमीक सर्व्हेमुळे आजूबाजूच्या परिसरामध्ये माशांची पैदास होत नाही. सेसमीक सर्व्हेमध्ये स्फोट केला जातोय. त्यामुळे या परिसरात मासेच शिल्लक राहत नाही. पूर्वी खनिज तेलाचा साधारण सर्व्हे केला जात होता.

# एसटीतून विनापरवानगी पार्सल नेल्यास चालक-वाहकांचे निलंबन

**मुंबई-** एसटीमधून खासगी व्यक्तींमार्फत पार्सल किंवा कुरियर स्वीकारून वाहतूक करणाऱ्या चालक व वाहकांवर आता निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय महामंडळाने जाहीर केला आहे. तसे पत्र सर्व विभाग नियंत्रकांना एसटीचे मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यांनी पाठवले आहे. कर्जत-आपटा एसटीत सापडलेल्या आयईडी बॉम्बच्या पार्श्वभूमीवर महामंडळाने तातडीने हा निर्णय जाहीर केला आहे. महामंडळाच्या



माहितीनुसार, काही चालक व वाहक खासगी व्यक्तींमार्फत पार्सल, कुरियर किंवा सामान स्वीकारत असल्याचे निदर्शनास आले आहे. मुळात अनधिकृतपणे सामानाची वाहतूक करू नये, असे आदेश प्रशासनाने दिलेले आहेत. तरीही त्याचे उल्लंघन होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. परिणामी, एसटीमध्ये स्फोटक वस्तूंची वाहतूक करून देशविघातक कारवाया घडवण्याची शक्यता महामंडळाने व्यक्त केली आहे. तसेच याबाबत आगार व्यवस्थापकांनी विभागातील चालक व वाहकांना स्पष्ट सूचना देण्यास महामंडळाने सांगितले आहे. जे चालक किंवा वाहक अनधिकृतपणे पार्सलची वाहतूक करतील, त्याविरोधात निलंबनाची कारवाईचे आदेश महामंडळाने दिले आहेत. चालक व वाहक पार्सल डेपोव्यतिरिक्त अशा प्रकारे सामानाची वाहतूक करत नसल्याचा दावा एसटी कामगार सेनेचे सरचिटणीस हिरेन रेडकर यांनी केला आहे. रेडकर म्हणाले की, एखादी अपवादात्मक घटना वगळता वाहकांचे प्रवाशांच्या सामानावर बारीक लक्ष असते.

# विकासकामांसाठी नगरसेवकांना ४५० कोटी

**मुंबई-** पालिका आयुक्तांनी यंदा विकास निधीला कात्री लावल्यामुळे नगरसेवकांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे. या पार्श्वभूमीवर स्थायी समितीने पालिकेच्या २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाला मंजुरी दिली. आता आगामी अर्थसंकल्प पालिका सभागृहात सादर करण्यात येणार असून त्यावर चर्चा करून मार्चच्या पहिल्या आठवड्यात त्याला मंजुरी देण्यात येणार असल्याचे समजते. पालिका आयुक्त अजोय मेहता यांनी २०१९-२० या आर्थिक वर्षाचा ३० हजार ६९२ कोटी ५९ लाख रुपयांचा अर्थसंकल्प अलीकडेच स्थायी समितीला सादर केला होता. अर्थसंकल्पात मुंबईमधील विकासकामांसाठी तब्बल ११ हजार कोटी रुपयांहून अधिक निधीची तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पावर स्थायी समितीमध्ये चर्चा करण्यात आली. आपल्या प्रभागांमध्ये छोटी-मोठी कामे करण्यासाठी ७०० कोटी रुपये विकास निधी उपलब्ध करावा अशी मागणी नगरसेवकांकडून करण्यात येत होती. मात्र मुंबई सागरी किनारा मार्ग, गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, मलजल प्रक्रिया केंद्रे, पाणीपुरवठा सुधारणा, पूल-रस्ते दुरुस्ती आदी विविध मोठी कामे पालिकेने हाती घेतली आहेत. या कामांसाठी मोठ्या निधीची आवश्यकता आहे. ही बाब लक्षात घेत पालिका आयुक्तांनी नगरसेवकांना ४५० कोटी रुपये विकास निधी उपलब्ध करून दिला आहे. गेल्या वर्षी ५०० कोटी रुपये विकास निधी मिळाला होता. यंदा त्यापेक्षा ५० कोटी रुपये कमी निधी मिळाल्यामुळे नगरसेवकांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे. या ४५० कोटी रुपयांमधील २३२ नगरसेवकांना प्रत्येकी एक कोटी रुपये विकास निधी देण्यात येणार आहे. उर्वरित २१८ कोटी रुपयांपैकी ५० कोटी रुपये महापौरांना, तर उर्वरित १६८ कोटी रुपयांचे सत्ताधारी शिवसेना, पहारेकरी भाजप, विरोधक काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पार्टीमध्ये वाटप करण्यात येणार आहे.



# उरलेल्या अन्नाच्या वाटपावर निर्बंध?

**मुंबई-** हॉटेल किंवा सोहळ्या-समारंभात उरलेले अन्न गरजू व्यक्तींमध्ये वाटण्याचे सामाजिक भान आता वाढू लागले आहे. असे अन्नपदार्थ गोळा करून ते गरिबांमध्ये वाटणाऱ्या संस्थाही कार्यरत आहेत. मात्र, अनेकदा या अन्नपदार्थाची आरोग्यदृष्ट्या तपासणी करण्यात येत नाही. हीच बाब लक्षात घेऊन 'सरप्लस फूड' अर्थात उरलेल्या अन्नपदार्थाचे दान वा मोफत वाटप करण्यावर कायद्याने निर्बंध आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय आरोग्य विभागाने भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण कायद्यामध्ये बदल करण्यासाठी मसुदा तयार केला असून त्यात अतिरिक्त अन्नपदार्थ दान करणाऱ्या व्यक्ती किंवा व्यावसायिक यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. हा मसुदा हरकती व सूचनांसाठी खुला करण्यात आला आहे. या मसुद्यानुसार अनावश्यक अन्नाचे संकलन करून गरजूंना वाटप करणाऱ्या संस्थांनी प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असेल. या संस्थाकडे अन्नाचे वाटप करण्यासाठी दळणवळणाची, जतन करण्यासाठी शीतगृहे आणि अन्नपदार्थ गरम



करण्याची सुविधा असणे आवश्यक आहे. नासलेल्या अन्नाचे वाटप करू नये, असे या मसुद्यात नमूद केले आहे. अन्नदाता आणि वाटप करणाऱ्या संस्थांनी दान केलेल्या अन्नाच्या नोंदी करून ठेवणे आवश्यक आहे. अन्नपदार्थाचे दान करण्यापूर्वी त्यावर संबंधित माहितीचे लेबल उपलब्ध असणे आवश्यक असेल. पॅकिंग किंवा वेष्टन असलेले अन्नपदार्थ दान करताना त्यावर अन्नपदार्थाचे नाव, निर्मितीची माहिती, अन्नघटकांची यादी आणि अन्नाची कालमर्यादा आदी इत्थंभूत माहितीचे मूळ लेबल असणे गरजेचे आहे. तसेच तयार केलेले अन्न दान करताना त्यावर अन्नपदार्थाच्या नावासह प्रकार (शाकाहारी -मांसाहारी), निर्मिती करणाऱ्याची माहिती, तयार केलेल्याची आणि कालमर्यादा आदी माहिती नमूद करावी. लेबलवरील माहिती स्पष्टपणे दिसेल अशा स्वरूपात लिहिलेली असेल, असे या मसुद्यात स्पष्ट केले आहे.या प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी राज्य सरकारच्या अन्न व सुरक्षा विभागाअंतर्गत समितीची नेमणूक केली जाईल.

# शिवसेनेच्या विरोधात पाच ठिकाणी राणेंचे उमेदवार

**मुंबई-** भाजप-शिवसेना युती झाली तरीही भाजपचे खासदार नारायण राणे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र स्वाभिमानी पक्ष राज्यातील पाच मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे करणार आहेत. विशेष म्हणजे हे पाचही मतदारसंघ शिवसेनेकडे आहेत. रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व अन्य एका मतदारसंघांत उमेदवार उभे करणार आहेत. 'आपला पक्ष स्वतंत्र असून, पक्षाच्या वतीने उमेदवार उभे करणार आहोत, असे राणे यांनी सांगितले.



प्रत्येक महसूल विभागात एक उमेदवार उभा केला जाईल. लोकसभा निवडणुकीत शिवसेनेला फार काही यश मिळणार नाही. ज्या काही जागा मिळतील त्या भाजपमुळे मिळतील, अशी पुष्टी राणे यांनी जोडली. भाजप आणि शिवसेना युतीचा निर्णय झाल्याच्या पार्श्वभूमीवर राणे यांनी मंगळवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात चर्चा झाली. आपली भूमिका त्यांच्याकडे स्पष्ट केल्याचेही राणे यांनी सांगितले.

# शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू

**मुंबई-** अनुदानित अशासकीय शाळांतील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही सातवा वेतन आयोग अखेर लागू करण्यात आला असून याबाबतचा निर्णय शासनाने शुक्रवारी जाहीर केला.

शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू होत असताना शिक्षकांना मात्र वेतन आयोग लागू करण्यात आला नसल्याचा आक्षेप संघटनांनी घेतला होता. त्याबाबत शासनाने शुक्रवारी निर्णय जाहीर केला असून शासकीय कर्मचाऱ्यांबरोबरच शिक्षकांनाही वेतन आयोग लागू करण्यात येणार




आहे. राज्यातील अनुदानित खासगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक महाविद्यालये आणि सैनिकी शाळांतील पूर्णवेळ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन लागू होणार आहे. 'सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर तब्बल सहा महिन्यांनतर शिक्षकांना याचा लाभ मिळाला होता तसेच पाचव्या वेतन आयोगाचा लाभ शिक्षकांना सुमारे चार महिन्यांनतर देण्यात आला होता. सातवा वेतन आयोग काही दिवसांतच देण्यात आला आहे.

# मुंबईचा वाघ करणार गुजरातच्या सिंहाचे रक्षण

**मुंबई-** आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून शिवसेना-भाजपाचे सूर पुन्हा एकदा जुळून आले आहेत. मात्र भाजपा आता मोठ्या भावाच्या भूमिकेत असल्याची खिल्ली विरोधकांकडून उडवली जात आहे. भायखळ्याच्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानात गुजरातवरून सिंह आणण्यात येणार असल्याची माहिती देत असताना महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांना अशाच काही प्रश्नांचा सामना करावा लागला. मात्र गुजरातमधील सिंह राणीबागेत आल्यानंतर त्याचे रक्षण मुंबईचा वाघ करणार, असा अप्रत्यक्ष टोला महापौरांनी भाजपाला लगावला. वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयाचे नूतनीकरण केले जात आहे. या प्रकल्पांतर्गत येथे विदेशातूनही पक्षी, प्राणी आयात करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाची माहिती अतिरिक्त आयुक्त आबासाहेब जऱ्हाड आणि महापौरांनी शुक्रवारी दिली. गुजरातमधील सिंह येथे आणण्यात येणार असल्याची माहितीही या वेळी प्रशासनाने दिली. या वेळेस प्रसारमाध्यमांनी शिवसेना-भाजपा युतीबाबत काही प्रश्न उपस्थित केले. युतीमुळे महापालिकेतील विविध समित्यांच्या अध्यक्षपदावर भाजपाकडून दावा केला जाण्याची शक्यता आहे. याबाबत विचारले असता अद्याप यावर काही निर्णय झालेला नाही, असे महापौरांनी स्पष्ट केले. सोबतच गुजरातमधील सिंह राणीबागेत आल्यानंतर त्याचे रक्षण मुंबईचा वाघ करणार, असा अप्रत्यक्ष टोलाही त्यांनी भाजपाला लगावला.



केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाकडून मिळालेल्या सूचनेनुसार वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानाचे आधुनिकीकरण आणि विस्तार करण्याचा प्रकल्प पालिकेने सुरू केले आहे. यामध्ये उद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या आराखड्यास प्राधिकरणाच्या तांत्रिक समितीने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. जग्वार, चित्ता, पांढरा सिंह, पाणघोडा, वॅलेबी, झेब्रा, जिराफ, मॅन्ड्रिल मंकी, ओकापी, इमू, शहामृग, चिंपाझी, लेसर प्लेमिंगो, रिंगटेल लेमूर हे प्राणी आणले जाणार आहेत.

## संपादकीय...

# ॲपसाठीही मानसिकता हवी!



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

सरकारच्या विविध प्रकल्पांसाठी लागणारी शेतजमीन नुकसान भरपाई देऊन ताब्यात घेतली जाते. भरपाईची रक्कम ठरवताना ७/१२ उताऱ्यावरील पीक नोंदीचा आधार घेतला जातो. या नोंदी उताऱ्यावर करताना महसूल खात्याकडून गाफीलपणामुळे किंवा हेतुपुरस्सरपणे केल्या जाणाऱ्या गंभीर चुकांमुळे केंद्र व राज्य सरकारांना मिळून दरवर्षी अब्जावधी रुपयांचा फटका बसतो. अनेक वर्षांपासून पीक नोंदीत चुका, घोटाळे होत आहेत. त्याकडे कोणी गांभीर्याने लक्ष देत नव्हते. घोटाळ्यांमुळे मोजावे लागणारे पैसे प्रचंड प्रमाणात वाढू लागल्यामुळेच महाराष्ट्र सरकारने त्यात दुरुस्तीचे पाऊल उचलले आहे. उताऱ्यावरील पीक नोंदीत अचूकता कशी येईल? या दृष्टीने मोबाइल ॲपचा वापर करण्याचे आदेश सरकारने काढले. टाटा ट्रस्ट व महाराष्ट्र सरकारचा हा संयुक्त प्रकल्प आहे. त्यानुसार मोबाइल ॲपद्वारे शेतकऱ्यांनी स्वत:च पीक नोंद करायची आहे. टाटा ट्रस्टने विकसित केलेल्या ॲपची पालघर जिल्ह्यातील करंजपाडा शिवारातील चाचणी यशस्वी झाली. आता सर्वच जिल्ह्यांतून तत्काळ अंमल करण्याचे सरकारचे आदेश आहेत. आंध्र प्रदेश सरकारनेही पिकांच्या अचूक नोंदींसाठी ड्रोनचा वापर सुरू केला आहे. केवळ पीक नोंदच नाही तर अन्य कामांसाठीही तेथे ड्रोन उपयोगात आणतात. डिजिटल महाराष्ट्र, तंत्रज्ञानात अग्रेसरची घोषणाबाजी करणारे महाराष्ट्र त्या बाबतीत खूपच मागे आहे. ७/१२ उताऱ्यावरील पीक नोंदीमध्ये अचूकता असली पाहिजे, असे सरकारला अचानक का वाटू लागले? पारदर्शकता आणणे, शेतकऱ्यांचा सहभाग, सुलभ कृषी पतपुरवठा, पीक विम्याची व नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीची अचूक भरपाई, अशी विविध कारणे राज्य सरकार आता सांगते. त्यात सध्या असलेल्या त्रुटींमुळे, केल्या जाणाऱ्या चुकांमुळे, भ्रष्टाचारामुळे जे प्रचंड पैसे केंद्र व राज्य सरकारांना मोजावे लागतात, त्या वाढत्या आकड्यांमुळे डोळे उघडल्यानंतरच दुरुस्तीची आवश्यकता सरकारला भासली. सोलापूरपासून जवळपास सारख्या अंतरावर असलेल्या दोन प्रकल्पांसाठी सरकारने वेगवेगळ्या दराने भरपाई रक्कम दिली. औष्णिक वीज प्रकल्पसाठी जमिनी घेताना सरासरी एकरी पाच लाख तर बोरामणी विमानतळासाठी एकरी सव्वा सात लाख रुपये दराने जमिनी घेतल्या. ज्यांना दर कमी मिळाला त्यांचे भांडण अजून चालूच आहे.



भरपाई ठरवताना जो जेवढा जास्त मुजोर तेवढा जास्तीचा दर, असे समीकरण बनले आहे. पुणे-सोलापूर राष्ट्रीय हमरस्त्यासाठी जमीन संपादन करताना एका पक्षाच्या जिल्हाध्यक्षाने डाळिंबाची बाग शेतात नसतानाही ती असल्याची नोंद उताऱ्यावर करून घेतली. दुसऱ्या एका बड्या महाभाग शेतकऱ्याने तर त्याच्याच शेतातली केळीची, डाळिंबाची झाडे काढून जी जमीन रस्त्यासाठी ताब्यात घेतली जाणार होती तेथे ती लावली. दोघांनाही भरमसाठ पैसे मिळाले. अशी अनेक उदाहरणे आहेत. विदर्भात बोंडअळीने कापसाचे नुकसान केले. भरपाईसाठी राज्यातून माहिती गोळा केली जात होती. तेव्हा अक्कलकोट तालुक्यात कापसाचे जेवढे क्षेत्र होते त्यापेक्षा भरमासाठ क्षेत्र कागदावर दाखवले गेले. पीक विमा कंपनीने त्याची तुलना कृषी खात्याच्या पीक पेरणी अहवालाशी करत जादाची मागणी फेटाळली. २०१६-१७ मध्ये सोयाबीनच्या बाबतीतही जादा भरपाईची मागणी झाली. शेतात पीक नसताना केवळ तलाठ्यांचा उतारा आहे, उताऱ्यावर नोंद आहे, म्हणून विमा कंपन्यांना पैसे द्यावे लागले. उपग्रहाद्वारे पाहणी करून घेतल्यानंतर कंपन्या भरपाईसाठी तयार नव्हत्या. राज्य सरकारच्या दबावामुळे त्यांनी ती दिली. तलाठी हा गावच्या पारावर किंवा स्वत:च्या घरात बसून पिकांच्या नोंदी उताऱ्यावर व पीक नोंदवहीत करतात. हे आकडे कृषी खात्याच्या पीक पेरणी अहवालाशी कधीच जुळत नाहीत. दोन्हींची सांगड विमा कंपन्यांनी घातल्यानंतरच त्यातला फोलपणा उघड झाला. नुकसानीचे आकडे ठरवण्याच्या सध्याच्या पद्धतीमुळे ज्याचे नुकसान झाले नाही, अशांनाही भरपाई मिळते. प्रकल्पांसाठी जमिनी ताब्यात घेताना कोरडवाहू शेती बागायत दाखवून पैसे लाटले जातात. शेतात पीक नसताना बागायती पिके, फळझाडे उभी आहेत, असे दाखवून त्यासाठीची मोठी भरपाई मिळवली जाते. महसूल यंत्रणेचे अधिकारी असल्याशिवाय हे होत नाही. शेजारच्या मुजोर शेतकऱ्याला मोठी भरपाई मिळते. पण दरबारी ताकद नसलेल्या छोट्याला नियमाचा बडगा दाखवत कमी पैसे दिले जातात. यातूनच आलेल्या प्रचंड वैफल्यामुळे तो शेतकरी आत्महत्येच्या मार्गाकडे वळायला बघतो. हे टाळण्यासाठीच राज्य सरकारने पीक नोंद पद्धतीत दुरुस्ती आणली खरी. निवडणुकांचा हंगाम संपेपर्यंत त्याची अंमलबजावणी होणे कठीणच. पण जेव्हा केव्हा होईल तेव्हा अंमल हा प्रशासकीय यंत्रणेच्या सहकार्यावर व मोबाइल ॲप वापराच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या मानसिकतेवर, साक्षरतेवर अवलंबून आहे.

# साळसूद इम्रान यांचे ढोंग



**'हे नवे पाकिस्तान आहे' असे सांगत तिथले पंतप्रधान इम्रान खान यांनी पुलवामा हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी सविस्तर निवेदन केले. 'अब भारत बदल गया है।' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाकिस्तानला दिलेल्या इशाऱ्याला हे उत्तर आहे, असे या एका वाक्यावरून वाटू शकते. पण इम्रान खान यांचे सविस्तर निवेदन ऐकले तर दोन्ही पंतप्रधानांच्या समानार्थी विधानांमध्ये किती फरक आहे, हे लक्षात येते. भारत आता केवळ निषेध करीत आणि इशारे देत बसणार नाही, कारण भारताची भूमिका ठरविणारे नेतृत्व आता बदलले आहे, हे मोदी सांगत होते. खान यांना 'दशहतवाद पोसणारा आणि स्वतःही त्याला बळी पडणारा पाकिस्तान आता राहिलेला नाही' हा तथाकथित बदल अधोरेखित करायचा होता. झळ सोसणारे आणि गंमत पाहाणारे यांच्यातला हा फरक आहे.**



पुलवामाचा हल्ला १४ फेब्रुवारीला झाला. त्यानंतर लगेचच भारतीय पंतप्रधानांनी पाकिस्तानला जबाबदार ठरवत इशारे द्यायला सुरूवात केली. त्यावर पाकिस्तानची अधिकृत प्रतिक्रिया काय येते, याकडे साऱ्या जगाचे लक्ष होते. तब्बल सहा दिवसांनी इम्रान खान मंगळवारी बोलले.

म्हणजे त्यांचे आधीच चित्रमुद्रित केलेले निवेदन अधिकृत वाहिनीवरून प्रसारित करण्यात आले. त्यांना थेट प्रक्षेपित होणारे निवेदनही करता आले असते. पण तो पाकिस्तान आहे आणि इम्रान हे सैन्याच्या हातातले बाहुले आहेत, हे विसरता येत नाही. सैन्याने आधी मंजूर केल्यानंतरच हे निवेदन प्रसारित झाले असणार, यात शंका नाही. या निवेदनातला आव मात्र, परिस्थिती पूर्ण बदलली आहे असे भासवणारा होता. त्यामुळे 'तुमच्याकडे काही पुरावे असतील तर द्या, हल्लेखोर पाकिस्तानी असतील तर मीच त्यांना कठोर शिक्षा करीन', हे इम्रान यांचे भारतीय पंतप्रधानांना उद्देशून केलेले आवाहन नुसतेच साळसुदपणाचे नाही तर, हास्यास्पदही आहे. पाकिस्तानात गेल्या १५ वर्षांत दहशतवादामुळे ७० हजार पाकिस्तानी नागरिकांनी प्राण गमावले आहेत आणि १०० दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त नुकसान या देशाने सोसले आहे, हा त्यांनी केलेला दावा खरा आहे. पण म्हणून पाकिस्तान त्यातून शहाणा झाला, असे काही घडले नाही. 'जैश -ए-महंमद'चा म्होरक्या मसूद अझहरला पाकिस्तानकडून मिळणारी मदत आणि आश्रय हे जागतिक पातळीवर लपून राहिलेले नाही. त्यामुळे पुलवामा हल्ल्याची जबाबदारी अधिकृतपणे जेव्हा 'जैश' कडून स्वीकारली गेली तेव्हाच या हल्ल्यातील पाकिस्तानचा सहभाग स्पष्ट झाला आहे. अशा परिस्थितीत या हल्ल्याशी पाकिस्तानचा काही संबंध नाही, भारत पुराव्यांशिवाय आरोप करीत आहे अशी विधाने करून इम्रान यांना जागतिक पातळीवर सहानुभूती मिळण्याची शक्यता तरी आहे का? अर्थात, पाकिस्तानची भूमी आणि सागरी किनारा हवा असल्याने चीनसारखा एखादा देश मसूद अझहरला अतिरेकी मानायलाही तयार होत नाही, हेही दुर्लक्ष करण्यासारखे नाही. 'खिलाडू' इम्रान खान यांच्या पंतप्रधान होण्याने पाकिस्तान बदलतो आहे, हे एकवेळ मान्यही करता आले असते; पण त्यासाठी त्यांनी जुना मार्ग तर सोडायला हवा ना. या हल्ल्याच्या निमित्ताने काश्मिरचा मुद्दा नव्याने उपस्थित करण्याची 'परंपरा' पाळायला इम्रान विसरले नाहीत. (पाकिस्तानी सैन्य त्यांना ते विसरू देण्याची शक्यताही नाही) काश्मिरच्या तरुणांना मृत्यूचीही भीती वाटू नये इतक्या टोकाला ते का जात असतील, याचे आत्मपरीक्षण करण्याचा उलटा सल्ला त्यांनी मोदींना दिला आहे. सैनिकांच्या बळावर अफगाणिस्तानचा प्रश्न सुटणार नाही तर चर्चेनेच सुटेल हे जगाला १७ वर्षांनी कळाले, भारताला काश्मिरच्या बाबतीत ते का कळत नाही, असाही त्यांचा प्रश्न आहे. आपण मात्र, भारताशी चर्चा करायला आजही तयार आहोत, अशी पुष्टीही ते जोडतात. भारत या निमित्ताने पाकिस्तानवर हल्ला करू इच्छितो, असे सांगत संयुक्त राष्ट्र संघात या बाबतीत आवाज उठवण्याची भाषाही इम्रान खान यांनी केली आहे. युद्ध कोणालाच परवडणार नाही, माणूस ते सुरू करू शकतो, पण ते बंद करणे त्याच्या हातात राहात नाही, अशी तात्विक विधानेही त्यांनी केली आहेत. याचा पाकिस्तान आता भारताला घाबरला आहे, असा अर्थ काढून त्याचे ढोल वाजवणारे लगेच पुढे आले आहेत. अर्थात, काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनी इम्रान यांना एक संधी दिली पाहिजे, असा सल्ला द्यायलाही विलंब केलेला नाही. भारतात हे निवडणुकीचे वर्ष आहे आणि त्यामुळे युद्धाची भाषा करून मोदी मते पदरात पाडून घेऊ इच्छीतात, असे थेट विधान इम्रान यांनी केले आहे. भारतातील एकूणच वाचाळवीरांचा उत्साह पाहाता इम्रान यांचे हे विधान अगदीच निरर्थक आहे, असेही म्हणता येत नाही. पण मोदींच्या विधानांमागे निवडणूक असेल तर मुफ्ती आणि त्यांचे समर्थक काय साधू इच्छीतात हेही इम्रान यांनी सांगायला हवे.

# प्रसूतिगृहाची जागा भाजप नगरसेविकेच्या संस्थेला?

**ठाणे-** ठाण्यातील नौपाडा भागात प्रसूतिगृह आणि आरोग्य केंद्रासाठी आरक्षित जागा एका भाजप नगरसेविकेशी संबंधित संस्थेला देण्यावरून नगरसेवकांमध्येच अंतर्गत वाद उफाळून आला आहे. प्रस्तावाविरोधात शुक्रवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन केले. योग्य भूमिका न घेतल्यास आयुक्तांच्या दालनाबाहेर आंदोलन करण्याचा इशाराही मनसेने दिला आहे. नौपाडा भागात प्रसूतिगृह आणि आरोग्य केंद्रासाठी आरक्षित जागा आहे. तिथे महापालिकेचे रात्र निवारा केंद्र सुरू होते. त्याला भाजपच्या स्थानिक नगरसेविकांनी विरोध केल्यामुळे महापालिकेने रात्र निवारा केंद्र बंद केले. आता 'द ऊर्जा' या बचत गटाला ही जागा देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने तयार केला आहे. तो शुक्रवारच्या सर्वसाधारण सभेत अंतिम मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. त्यावरून भाजपच्या स्थानिक नगरसेवकांमध्येच अंतर्गत वाद उफाळून आला असतानाच त्यात आता मनसेने उडी घेतली आहे. मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.

# वसई-विरारचा करवाढ नसलेला अर्थसंकल्प

**वसई-** वसई विरार महापालिकेच्या स्थायी समितीने आगामी २०१९-२० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्र शुक्र वारी झालेल्या विशेष महासभेत सादर केले. या वर्षात २०२० कोटी रु पये खर्च आणि २४२ कोटी रु पये शिलकीचे एकूण १८५७ कोटी ६८ लाख रु पये रक्कमेचे अर्थसंकिल्पय अंदाजपत्रक सादर करण्यात आले. त्यात नवीन पाणी योजना, रुग्णालयांची निर्मिती, अत्याधुनिक क्रीडा संकुल आदींचा समावेश आहे. कोणतीही करवाढ नसल्याने या अर्थसंकल्पात आगामी निवडणूकीचा विचार केला आहे. महापालिकेच्या २०१९-२० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक आयुक्तांनी मागील आठवड्यात सादर केला होता. त्यात सुधारण करून स्थायी समिती सभापती सुदेश चौधरी यांनी ते शुक्रवारी सायंकाळी महासभेत सादर केला. आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात २५९ कोटी रु पयांची शिल्लक दाखिवण्यात आली होती आणि २ हजार २६२ कोटी रु पयांचे अंदाजपत्रक बनविण्यात आले होते. स्थायी समितीने यात अनेक सुधारणा केल्या आहेत. २०१९-२० मध्ये प्रारंभिक शिल्लक ४०५ कोटी १५ लाख १ हजार ८५७ कोटी ६८ लाख जमा आणि २ हजार २० कोटी ६७ लाख रु पये खर्च असा २४२ कोटी रु पये शिल्लकीचे असे एकूण १ हजार ८५७ कोटी ६८ लाख रु पयांचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले.

यात आरोग्य सेवा संपुर्णपणे मोफत देण्यात आली आहे. वसई कौलसिटी येथे २०० खाटांचे मिल्टस्पेशालिटी रु ग्णालय आणि नालासोपाऱ्याच्या आचोळे येथे ३०० खाटांचे अत्याधुनिक सुविधा असलेले रु ग्णालय प्रस्तावित करण्यात आले आहे. देहरजा नदीवर आखण्यात आलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी पालिकेने शासनाच्या जलसंपदा विभागाकडे १६७ कोटी आणि सुसरी प्रकल्पासाठी १६ कोटी रूपये जमा केले आहेत. या योजनेमुळे वसई विरार शहरास प्रतिदिन ४९० दशलक्ष लीटर पाणी मिळणार आहे.

# ठाणे ते नवी मुंबईदरम्यान जलवाहतूक

**ठाणे- मुंबई महानगर क्षेत्रात दळणवळणाचे वेगवेगळे पर्याय उपलब्ध व्हावेत यासाठी केंद्र सरकारने ठाणे महापालिकेच्या पुढाकाराने सुरू केलेल्या प्रयत्नांना लवकरच मूर्त स्वरूप मिळण्याची चिन्हे दिसू लागली असून वसई-ठाणे-कल्याण या ५४ किलोमीटर अंतराच्या जलमार्गाचा भूमिपूजन सोहळा येत्या लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी हाती घेतला जाण्याची शक्यता आहे. त्यातच आता ठाणे ते नवी मुंबईदरम्यान जलवाहतूक सुरू करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम येत्या वर्षांत केले जाणार असून त्यासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

मुंबई महानगर क्षेत्राला लाभलेल्या विस्तीर्ण अशा खाडीकिनाऱ्याचा वापर जलवाहतुकीसाठी केला जावा हा प्रस्ताव तसा जुना आहे. ठाणे महापालिकेने तीन वर्षांपूर्वी यासाठी प्रयत्न सुरू केले. आयुक्त संजीव जयस्वाल यांनी अंतर्गत तसेच बाह्य जलवाहतूक प्रकल्पांची घोषणा अर्थसंकल्पात केल्यानंतर गेल्या काही वर्षांपासून यासंदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. केंद्रीय आंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाची सूत्रे असलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ठाणे पालिकेच्या आराखड्यास अनुकूलताही दर्शवली आहे. या प्रकल्पाच्या कामाचे भूमिपूजन लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. सुमारे ६६१ कोटी १४ लाख रुपयांच्या प्रकल्प अहवालास केंद्र सरकारने मान्यता दिल्याची माहिती ठाणे पालिकेचे आयुक्त संजीव जयस्वाल यांनी बुधवारी पालिकेचा अर्थसंकल्प सादर करताना दिली. हे करत असताना ठाणे ते मुंबई आणि ठाणे ते नवी मुंबई या मार्गावर दुसऱ्या टप्प्यात जलवाहतूक सुरू व्हावी यासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याचे कामही पालिका करणार आहे. त्यास केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखविला आहे, अशी माहिती जयस्वाल यांनी दिली. या प्रकल्पात वसई, मीरा-भाईंदर, घोडबंदर, नागला, काल्हेर, अंजूर दिवे, पारसिक, डोंबिवली आणि कल्याण येथे जेटी बांधणे, फेअरवे डेव्हलपमेंट अशी कामे केली जाणार आहेत.



सिडको तसेच मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने यापूर्वी बेलापूर तसेच नेरुळ भागातून गेट वे ऑफ इंडियापर्यंत वेगवेगळ्या मार्गाची आखणी केली आहे. असे असले तरी ठाण्यापासून नवी मुंबईपर्यंतच्या जलमार्गाचा फारसा गांभिर्याने विचार झालेला नाही. ठाणे महापालिकेने यासाठी पुढाकार घेतान केंद्र सरकारने त्यास हिरवा कंदील दाखविला असून ठाणे नवी मुंबईदरम्यान वाशी, नेरुळ, बेलापूर, तळोजा, जुई गाव, पनवेल, जेएनपीटी आणि उरण लगतचे मोरा बंदरापर्यंतच्या आठ स्थानकांचा प्राथमिक प्रकल्प अहवालही तयार करण्यात आला आहे, अशी माहिती जयस्वाल यांनी दिली.


# वसईमध्ये तिवरांची घुसमट, उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही टंगळमंगळ

**वसई-** तिवरांची बेसुमार कत्तल व पाणथळ जमिनीवर होत असलेल्या बेकायदा अतिक्रमणाबाबत वारंवार महसूल व महापालिका प्रशासनाकडे तक्रार करूनही कुठलीही ठोस कारवाई होत नसल्यामुळे या दोन्ही विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणाचा निषेध करण्यासाठी पर्यावरण संवर्धन समितीने आता पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसले आहे. त्यासाठी पर्यावरण संवर्धन समितीचे समन्वयक समीर वर्तक, मॅकेंझी डाबरे समिती त्यांचे शेकडो सहकारी सोमवार पासून वसई तहसीलदार कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसणार असल्याची माहिती वर्तक यांनी दिली. जोपर्यंत तिवरांची कत्तल व पाणथळ जमिनीवरील अतिक्र मणा विरु द्ध ठोस कारवाईस आरंभ होत नाही तोपर्यंत हे बेमुदत उपोषण सुरूच राहणार असल्याचा निर्धार करण्यात आला आहे. उपोषणाचे पत्र वजा निवेदन नुकतेच पर्यावरण संवर्धन समितीने वसई प्रांताधिकारी डॉ. दीपक क्षीरसागर व वसई तहसीलदार किरण सुरवसे यांची भेट घेऊन त्यांना दिले आहे. दरम्यान, वसई पश्चिमेकडील भुईगाव येथे तिवर वृक्षांची कत्तल करून तसेच पाणथळीच्या जागेवर अतिक्र मण करून त्याठिकाणी कोळंबी प्रकल्प राबविण्यात येत आहे. याबाबत महसूल तसेच महापालिकेकडे अनेकदा तक्र ार करूनही त्यावर कुठलीही कारवाई झालेली नाही. तर शासकीय अधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळेच मागील दोन ते अडीच वर्षात पाणथळ जमिनीवरील अतिक्र मणात व तिवरांच्या कत्तलीत दुपटीने वाढ झाली असल्याची माहिती वर्तक यांनी पुन्हा एकदा वसई प्रांत व तहसीलदारांना दिली आहे. मात्र, कारवाई शुन्य आहे.



# ऑनलाइन बदल्यांच्या निषेधार्थ शिक्षक नाराज

**पालघर-** शिक्षण विभागाकडून करण्यात आलेल्या ऑनलाइन बदल्या या आमच्यावर अन्यायकारक असल्याच्या निषेधार्थ शेकडो शिक्षकांनी जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागाला घेराव घालीत आपला रोष व्यक्त केला. शासनाच्या शिक्षण विभागाकडून शिक्षकांच्या करण्यात आलेल्या ऑनलाइन बदल्या या अन्यायकारक पद्धतीने करण्यात आल्या असून संकेतस्थळामध्ये किंवा लेखी भरण्याच्या माहिती नमुन्यामध्ये खूप त्रुटी असल्याने याचा फटका बसलेले व विस्थापित झालेल्या शेकडो पदवीधर शिक्षकानी या निषेधार्थ आपला मोर्चा जिल्हा परिषदेवर वळवला.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरकर, उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती निलेश गंधे व शिक्षणाधिकारी यांची भेट घेऊन या ऑनलाईन प्रक्रि येतील त्रुटी मध्ये सुधारणात्मक बदल करून ते शासनाला कळवण्याची मागणी केली. ऑनलाइन पद्धतीने करण्यात आलेल्या प्रणाली मध्ये जिल्ह्यातील आठ तालुक्यांमधील ९ मुख्याध्यापक ५६ पदवीधर शिक्षक २७३ सहशिक्षक असे ३३८ शिक्षक असे एकूण ६७६ लोक विस्थापित होणार आहेत. मुंबई व उपनगरातील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद पडल्यामुळे तेथील सुमारे साडेतीनशे शिक्षक हे जिल्ह्यात येणार आहेत. असे असताना ते इथे आल्यास इथे कार्यरत असलेले मुळ शिक्षक हे अतिरिक्त होणार आहेत. त्याचप्रमाणे जे शिक्षक अतिरिक्त झाले आहेत त्यांनाच उर्विरत शाळेत का घेतले जात नाही? असा प्रश्न विचारला जात आहे.

# ध्वनिप्रदूषणाला भिंतीद्वारे आवर!

## ठाणे महापालिकेतर्फे २६ ठिकाणी ध्वनिनियंत्रण यंत्रणा; शैक्षणिक संस्था, रुग्णालयांच्या परिसरात ध्वनिरोधक भिंती

**ठाणे-** ठाणे शहरात वाहनांच्या अविरत वर्दळीमुळे होणारे ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी आता महापालिकेने तंत्रज्ञानाची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यावरण क्षेत्रातील संशोधक संस्था असलेल्या 'निरी'च्या अहवालानुसार शहरात २६ ठिकाणी ध्वनिरोधक भिंती उभारल्या जाणार असल्याची माहिती पालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी दिली. शाळा, महाविद्यालये, सिग्नल शाळा आणि रुग्णालयांच्या परिसरात प्रामुख्याने अशा भिंती उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

ठाणे महापालिका क्षेत्रातील वाहनांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. तसेच शहराच्या अनेक भागांत दिवसरात्र वाहनांची वर्दळ सुरू असते. या वाहनांच्या तसेच त्यांच्या हॉर्नच्या आवाजामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनिप्रदूषणही निर्माण होत आहे. याचा सर्वाधिक त्रास शाळा-महाविद्यालयांचा परिसर, रुग्णालये यांना होत असतो. जुन्या ठाण्यातील गोखले मार्ग, उथळसर, पाचपाखाडी अशा भागांमध्ये रस्त्यांच्या लगतच शाळा, रुग्णालयांची उभारणी झाली आहे. रहदारीच्या रस्त्यांवरून जाणाऱ्या वाहनांच्या आवाजामुळे विद्यार्थी आणि रुग्णांना त्रास होतो, अशा तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत.



त्यामुळे या सर्वाचा अभ्यास करून आवश्यक त्या ठिकाणी ध्वनिरोधक यंत्रणा उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, सिग्नल शाळा, प्लॅटफार्म शाळा आणि रुग्णालये अशा २६ ठिकाणचा प्रशासन निरी संस्थेच्या माध्यमातून शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करणार आहे. या अभ्यासातील निष्कर्षांच्या आधारे त्याठिकाणी ध्वनिनियंत्रण योजना राबविली जाणार आहे. या योजनेत ध्वनिरोधक भिंती उभारल्या जाणार आहेत.

# दुसऱ्या पत्नीची मुलेही अनुकंपा नोकरीसाठी पात्र ठरणार

**मुंबई- एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याने त्याची पहिली पत्नी हयात असताना दुसरा विवाह केला तर अशा दुसऱ्या पत्नीपासून त्याला झालेली मुलेही त्याच्या मृत्यूनंतर अनुकंपा नोकरीसाठी पात्र ठरतात, असा निकाल पुन्हा एकदा देत मुंबई उच्च न्यायालयाने अशा एका मुलाने अनुकंपा नोकरीसाठी केलेल्या अर्जावर दोन महिन्यांत सुयोग्य निर्णय घेण्याचा आदेश मध्य रेल्वेला दिला.**

उच्च न्यायालयाने असाच निकाल १ एप्रिल २०१६ रोजी पंचमुखी मारुती रोड, कल्याण येथील व्ही. आर. त्रिपाठीने केलेल्या याचिकेवर दिला होता. गेल्या डिसेंबरमध्ये सर्वोच्च न्यायालयानेही तो निकाल कायम केला होता. आताचा ताजा निकाल न्या. अभय ओक व न्या. संदीप के. शिंदे यांच्या खंडपीठाने लतिफवाडी




(सावरवाडी), पो. विहीगाव, ता. शहापूर, जि. ठाणे येथील युवराज खडकेने केलेल्या याचिकेवर दिला.

युवराजचे वडील दाजी जावू हे मध्य रेल्वेत नोकरीला होते. १२ ऑगस्ट २००३ रोजी नोकरीत असतानाच त्यांचे निधन झाले. युवराज हा दाजी यांच्या दुसऱ्या पत्नीचा मुलगा. वडिलांच्या निधनानंतर त्याने अनुकंपा नोकरीसाठी अर्ज केला. पण वडिलांनी दुसरे लग्न करताना रेल्वेची पूर्वपरवानगी घेतली नव्हती व पहिली पत्नी हयात असताना केलेले असे दुसरे लग्न बेकायदा ठरते, असे कारण देत रेल्वेने अर्ज फेटाळला.

याआधी त्रिपाठी व युवराजच्या प्रकरणात रेल्वेचा निर्णय चुकीचा ठरविताना न्यायालयाने म्हटले की, हिंदू विवाह कायद्यानुसार पहिली पत्नी हयात असताना केलेले दुसरे लग्न अवैध असले तरी दुसऱ्या लग्नातून झालेली मुले औरसच मानण्याची स्पष्ट तरतूद त्याच कायद्यात आहे. त्यामुळे रेल्वे दुसऱ्या पत्नीच्या मुलांच्या बाबतीत भेदभाव करू शकत नाही. हाच निकाल अपिलात सर्वोच्च न्यायालयात गेला तेव्हा रेल्वेने युक्तिवाद केला की, दुसऱ्या पत्नीची मुले कायद्याने औरस ठरत असली तरी त्यांचा हा हक्क वडिलांच्या मृत्यूनंतर वारसाहक्काने त्यांच्या मालमत्तेत वाटा मिळण्यापुरता आहे. व्याप्ती वाढवून तो अनुकंपा नोकरीस लागू केला जाऊ शकत नाही. मात्र सर्वोच्च न्यायालयाने तो फेटाळल्याने उच्च न्यायालयाचा निकाल पूर्णांशाने कायम झाला आहे.

# आरक्षणाचा अधिकार राज्य सरकारांना नाही

**मुंबई -** एखाद्या समाजाला मागास दर्जा देऊन आरक्षण द्यायचे की नाही, याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे, राज्य सरकारे केवळ विशिष्ट समाजाबाबत प्रस्ताव देऊ शकतात; पण सरकारला आरक्षण देण्याचा अधिकार नाही, असा युक्तिवाद मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांकडून गुरुवारी




उच्च न्यायालयात करण्यात आला. २०१४ मध्ये जरी आरक्षणासंदर्भात निर्णय घेण्यात आला असला तरी त्या आधीच्या प्रत्येक आयोगाच्या अहवालात मराठा समाज प्रगत आहे, असेच मांडण्यात आले आहे, असेही याचिकाकर्त्यांच्या वतीने सांगण्यात आले. एखादा समाज अपवादात्मक परिस्थितीत मागास असल्यास त्या समाजाची संबंधित अपवादात्मक परिस्थिती राज्य सरकारने सिद्ध करणे आवश्यक आहे; तरच राज्य सरकार स्वतःच्या विशेषाधिकारामध्ये त्या समाजाला अधिक सवलती देऊ शकते. मात्र मराठा आरक्षणाचा निर्णय घेताना सरकारने अशा प्रकारच्या कोणत्याही अपवादात्मक परिस्थितीचा सखोल आढावा अधोरेखित केलेला नाही, असेही सुनावणीत मांडण्यात आले. राणे समितीच्या अहवालातही मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास असल्याचे म्हटलेले नाही.

# बेपत्ता विद्यार्थिनीचा मृतदेह धोम जलाशयात सापडला

**वाई-** तीन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या कोंढावळे (ता. वाई) येथील अस्मिता सुरेश कोंढाळकर (वय १५) या विद्यार्थिनीचा मृतदेह गुरुवारी धोम धरणाच्या जलाशयात सापडला. तिचा घातपात झाला असल्याचा संशय नातेवाइकांनी व्यक्त केला आहे. अस्मिता कोंढाळकर



ही सोमवारी (दि. १८) रात्री नऊ वाजता वाशिवली, ता. वाई येथे एका कार्यक्रमाला गेली होती. त्या रात्री ती घरी परतली नाही. त्यामुळे कुटुंबीय व काही नातेवाइकांनी पाहुण्यांकडे व आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला;

पण ती सापडली नाही. या प्रकरणी गुरुवारी सकाळी वाई पोलीस ठाण्यात तिच्या कुटुंबीयांनी फिर्याद दाखल केली. दरम्यान, सायंकाळी पाचच्या सुमारास तिचा मृतदेह धोम धरणाच्या जलाशयात झिरमित झरा येथे आढळला. वाई पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. अस्मिता ही वाशिवलीतील मुकाईदेवी माध्यमिक विद्यालयात इयत्ता नववीत शिकत होती. तिच्या पश्चात आई, वडील, एक बहीण, दोन लहान भाऊ असा परिवार आहे. पोलीस उपनिरीक्षक पी. एस. कदम तपास करत आहेत.

# मुंबई लोकलवर दहशतवादी हल्ल्याचा इशारा, अलर्ट जारी

**मुंबई-** मुंबईतील गर्दीच्या रेल्वे स्थानकांवर येत्या तीन महिन्यांत दहशतवादी हल्ला होण्याचा इशारा गुप्तचर संघटनांनी दिला आहे. त्यामुळे मुंबईच्या गर्दीच्या रेल्वेस्थानकांवर सुरक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे.

गुप्तचर संघटनांनी दिलेल्या या इशाऱ्यानंतर आता सुरक्षा यंत्रणाही अधिक तत्पर झाल्या आहेत. तर प्रवाशांनाही सहकार्य करण्याचं आवाहन केलं जात आहे. मुंबईची लाइफलाइन असलेल्या लोकलमध्ये दररोज लाखो जण प्रवास करतात. सुरक्षाव्यवस्थेत वाढ करा, संशयास्पद व्यक्तींना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करा, रेल्वे स्थानकांवर मेल-एक्स्प्रेसमध्ये शोध मोहीम, अशा प्रकारची खबरदारी आता घेतली जात आहे. दरम्यान, जम्मू-काश्मीरमध्ये पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर गुप्तचर



विभागाने गुजरातमध्ये दहशतवादी हल्ले होण्याची शक्यता काही दिवसांपूर्वीच व्यक्त केली आहे. यासंदर्भात गुजरात पोलिसांना माहिती देण्यात आली असून राज्यात अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुलवामा येथे गुरुवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ४० जवान ठार झाले होते. गुप्तचर विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यातील महत्त्वाच्या ठिकाणी दहशतवादी हल्ल्याची शक्यता आहे. यात प्रमुख रेल्वे स्थानक, गुजरातची किनारपट्टी, स्टेच्यू ऑफ युनिटी, धार्मिक स्थळ आणि चित्रपटगृहांचा समावेश आहे. राज्य पोलिस दलाने या सर्व ठिकाणची सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार काही दहशतवादी गुजरातमध्ये असून त्यात एका महिलेचा देखील समावेश आहे.

# मोदींना ८३ टक्के नागरिकांची पसंती

**नवी दिल्ली-** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एका खासगी वृत्तसंस्थेतर्फे घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात ८३ टक्के नागरिकांनी पंतप्रधानपदासाठी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पसंती दर्शविली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. मात्र, त्यापूर्वीच विविध संस्था आणि वृत्तसंस्थांतर्फे ऑनलाइन सर्वेक्षणे घेण्यात येत आहेत. एका खासगी वृत्तसंस्थेद्वारे घेण्यात आलेल्या ऑनलाइन सर्वेक्षणात देशातील ८३ टक्के लोकांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारला आपली पसंती दर्शविली आहे. देशात आज मतदान झाले, तर ८३.८९ टक्के लोकांनी पंतप्रधानपदासाठी मोदी यांना पहिली पसंती दिली आहे. त्याचप्रमाणे निवडणुकीनंतर ८३.०४ टक्के लोकांनी मोदींच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारला पसंती दर्शविली.



सर्वेक्षणात पंतप्रधानपदासाठी राहुल गांधी यांना ८.३३ टक्के, ममता बॅनर्जी यांना १.४४ टक्के आणि मायावती यांना ०.४२ टक्के लोकांनी पसंती दिली आहे, तर ५.९ टक्के लोकांनी यांच्याव्यतिरिक्तही आणखी कोणी पंतप्रधान होऊ शकतो, असे मत व्यक्त केले आहे. सर्वेक्षणात मोदी सरकारच्या पाच वर्षांच्या कार्यकाळाविषयी लोकांनी समाधानकारक असल्याचे मत नोंदविले आहे. आकडेवारीनुसार सुमारे ५९.५१ टक्के लोकांनी सरकारचे काम फार चांगले असल्याचे सांगितले, तर २२.२९ टक्के लोकांनी चांगले असल्याचे मत दिले. त्याचप्रमाणे ८.२५ टक्के लोकांनी मोदी सरकारचा कार्यकाळ साधारण असल्याचा आणि ९.९४ टक्के लोकांनी कार्यकाळाविषयी नाराजी व्यक्त केली आहे. जीएसटी (२९.०९ टक्के), स्वच्छ भारत योजना (१८.६८ टक्के) आणि सर्जिकल स्ट्राइकला (१७.८४) जनतेने मोदी सरकारचे यश मानले आहे.

# भविष्यात भारताला ऑलिम्पिक स्पर्धेचं आयोजन करता येणार नाही- आयओसी

**मुंबई-** पाकिस्तानी नेमबाजांना नवी दिल्लीत होणाऱ्या रायफल शुटींग विश्वचषकासाठी व्हीसा नाकारल्यामुळे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेनं भारताशी संवाद बंद केलाय. नवी दिल्लीत होणारा विश्वचषक होणार असला तरी त्यातील २५ मीटर रॅपिड फायर इव्हेंटचा ऑलिम्पिक दर्जाही काढून घेतलाय. भविष्यात भारताला ऑलिम्पिकशी संबंधित क्रीडा स्पर्धा आयोजित करता येणार नाहीत असं ऑलिम्पिक संघटनेनं म्हटलंय.

पुलवामात १४ फेब्रुवारीला झालेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात सीआरपीएफ दलाचे ४० जवान शहीद झाले. या हल्ल्याविरोधात भारतीयांमध्ये प्रचंड उद्रेक पाहायला मिळाला. या भ्याड हल्ल्याविरोधात क्रीडा क्षेत्रातही तीव्र संताप पाहायला मिळाला. या घटनेनंतर पाकिस्तानशी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवायचे नाही अशी मागणी जोर धरु लागली. त्यामुळे दिल्लीतील नेमबाजी विश्वचषकासाठी येणाऱ्या पाकिस्तानी नेमबाजांना व्हिसा नाकारण्यात आला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने भविष्यात भारतात ऑलिम्पिक दर्जाच्या स्पर्धांचे आयोजन करण्यासंदर्भात बंदी घातली आहे. आयओसीच्या सभेत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे भारताचे क्रीडा क्षेत्रातील नुकसान होणार आहे.

दहशतवादी हल्ल्यानंतर कोणत्याही प्रकारचे संबंध पाकिस्तान सोबत ठेवायचे नाही. यानंतर पाकिस्तानच्या दोन नेमबाजांना नेमबाजी वर्ल्ड कप मध्ये व्हिसा नाकारण्यात आला. भारताच्या या



भुमिकेविरोधात नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ पाकिस्तान या संघटनेने आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेकडे या सर्व प्रकारची तक्रार केली. आयओसीने या सर्व संदर्भात एक पत्रक जाहीर केले आहे. या बाबतीत भारताच्या एनओसी, आयओसी तसेच आयएसएसएफने प्रयत्न केले. या प्रयत्नानंतर देखील पाकिस्तानच्या या नेमबाजांना सहभागी करण्या संदर्भात कोणताही सकारात्मक निर्णय झाला नाही. ही भूमिका कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता आयओसीच्या निर्णयाविरोधात आहे.

# चीन उत्पादित वस्तूंच्या बहिष्कारासाठी 'कॅट' राबविणार राष्ट्रीय मोहीम!

**अकोला-** चीन उत्पादित वस्तूंवर भारतीयांनी बहिष्कार घालून पाकिस्तानला धडा शिकवावा, असे आवाहन राष्ट्रीय 'कॅट'चे सचिव अशोक डालमिया यांनी केले असून, यासंदर्भात 'कॅट' राष्ट्रीय अभियान सुरू करीत असल्याची माहिती त्यांनी एका वृत्तपत्राशी बोलतांना दिली आहे.पुलवामा येथे शहीद झालेल्या ४४ सीआरपीएफ जवानांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली द्यायची असेल, तर पाकिस्तानची चौफेर कोंडी करणे गरजेचे आहे. त्यासाठी पाकिस्तानला मदत करणाऱ्यांनादेखील धडा शिकवावा लागेल. तेव्हाच ते पाकिस्तानला मदत करणे थांबवतील, असे 'कॅट'चे मत आहे. 'कॅट'चे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया यांच्या नेतृत्वात चीन उत्पादित वस्तूंवर बहिष्कार टाकण्याची मोहीम तीव्र केली जात आहे. चीन हा पाकिस्तानचा सर्वांत मोठा समर्थक असून, आर्थिकसह इतरही मदत तो पाकिस्तानला करीत असतो. दुसरीकडे चीनची संपूर्ण बाजारपेठ भारताच्या भरवशावर आहे. चीनची प्रत्येक वस्तू भारतात विकल्या जाते. जर आम्ही चीनच्या उत्पादित वस्तूंवर बहिष्कार घातला तर चीनची आर्थिक व्यवस्था कोलमोडण्याची शक्यता आहे. पर्यायाने त्याला पाकिस्तानची मदत थांबवावी लागेल. चीन आणि पाकिस्तान यांना धडा शिकविण्यासाठी भारतीयांनी चीन



उत्पादित वस्तूंवर बहिष्कार घातला पाहिजे, असा सामाजिक संदेश देत कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट)ने राष्ट्रीय अभियान सुरू केले आहे, अशी माहिती राष्ट्रीय 'कॅट'चे सचिव अशोक डालमिया यांनी दिली आहे. कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) ने देशभरातील चीन निर्मित वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असून, हे अभियान राबविण्यासाठी मोहीम उघडली जात आहे. चीन निर्मित साहित्यावर बहिष्कार घालण्यासाठी मोर्चे काढून जनजागृती करण्याचादेखील कार्यक्रम आहे. सोबतच आगामी मार्चमध्ये येत असलेल्या होळीमध्ये चीन उत्पादित वस्तू जाळण्याचे आवाहन 'कॅट'तर्फे केले जाणार आहे.

# भाईंदरमध्ये सर्वजाती सामूहिक विवाह सोहळा संपन्न



**भाईंदर-** राईपूर धनलक्ष्मी जनसेवा ट्रस्टच्या वतीने भाईंदर पूर्व बाळासाहेब ठाकरे मैदानात २४ फेब्रुवारी २०१९ रोजी सर्वजाती



सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात एकूण १५ जोडप्यांचे लग्न पार पडले. संस्थेच्या वतिने मंगळसूत्र पासून कौटुंबिक जीवनात संसारात लागणाऱ्या सर्व वस्तू संस्थे करून कन्यादान रुपी देण्यात आले. गेल्या वर्षी याच ठिकाणी ११ जोडप्यांच लग्न समारंभ उत्साहात सम्पन्न झाला होता. तर या वर्षी १५ जोडप्याचं लग्न पार पडले. यामध्ये मराठी ११ जोडपी, ३ गुजराती, तर १ तेलगू गोरगरीब जोडपी होती. या वर्षी या लग्नसोहळ्यात ५ हजार पेक्षा जास्त लोकांनी जेवणाचा स्वाद घेतला. विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तर ठाणे लोकसभेचे खासदार राजन विचारे,आमदार प्रताप सरनाईक, मीरा भाईंदरच्या महापौर डिंपल मेहता सह संस्थेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# बेकायदेशीर वास्तव्य करणारे बांग्लादेशी ताब्यात

**ठाणे-** श्री सुनील दत्तात्रय शिंदे सपोनि अ.मा.वा.शा. ठाणे ग्रामीण यांनी गेल्या काही दिवसांत मिरा-भाईंदर परिसरात अनधिकृतपणे राहणारे बांग्लादेशी यांची शोध मोहिम हाती घेतली आहे. सदर कारवाई सुरू असतानाच दि. २२-२-२०१९ रोजी त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मिरा-भाईंदर परिसरात अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेले बांग्लादेशी नागरीक हे सृष्टी सेक्टर नं. ५, जटायु बिल्डिंग समोर, काशिमिरा येथे कामकाजाकरिता एकत्र येत असतात. त्यावरुन सपोनि शिंदे, पोहवा चौधरी, पोना तावरे, पोशि शिंदे, मपोना यंबर, सपोना चव्हाण नेम अमावाशा यांनी सापळा रचून नमूद ठिकाणी छापा टाकला असता एक संशयित इसम पळून जात असताना त्यास मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊन चौकशी केली असता सदर बांग्लादेशी इसम हा सुमारे ०१ वर्षापासून सेव्हन इलेव्हन स्कूल जवळ येथे पारपत्र व व्हिसाशिवाय भारतात वास्तव्य करत असताना मिळून आला म्हणून काशिमिरा पोलिस ठाणे गु. रजि. नं. ११८/२०१९ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९२० चे कलम ३ (अ), ६ (अ) सह विदेशी नागरिक अधिनियम १९४६ चे कलम १४ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाईत १ इसमास ताब्यात घेतले असून पुढील कार्यवाही काशिमिरा पोलिस ठाणे करत आहे. सदर कारवाई मा. डॉ. शिवाजीराव राठोड पोलिस अधिक्षक ठाणे ग्रामीण, मा. श्री. संजयकुमार पाटील अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि शिंदे, पोहवा इंगळे, चौधरी, पोना तावरे, पोशि शिंदे, मपोना यंबर, मपोना चव्हाण नेम अमावाशा पोलिस स्टाफ यांनी पार पाडली आहे.

# भूकंपग्रस्त भागांतील परीक्षा केंद्रांवर उपाययोजनांचा अभाव

**पालघर-** भूकंपभीतीच्या छायेखाली डहाणू व तलासरी तालुक्यांत गुरुवारी बारावीची परीक्षा सुरू झाली. विद्यार्थी आणि पालक भीतीच्या अवस्थेत असतानाही परीक्षा केंद्रांवर मात्र सुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन उपाययोजनांचा अभाव आढळून आला आहे. डहाणू आणि तलासरी तालुक्यांतील सुमारे पावणेसहा हजार विद्यार्थी गुरुवारपासून बारावीच्या परीक्षेला बसले आहेत. मात्र त्यांच्या सुरक्षेकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले असून विद्यर्थ्यांच्या जिवाशी खेळत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. भूकंपप्रवण क्षेत्रात परीक्षा केंद्रांवर आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाकडून कोणतीच सोय करण्यात आली नाही.



अखिल भारतीय मानव अधिकार युनियन
सभासद नोंदणी सुरु
अध्यक्ष : श्री. दिपक मोरेश्वर नाईक मो. ८४२४९८९८९८
सचिव : श्री. विनोद दशरथ मेढे मो. ८६९२०११११०
सदस्य नोंदणी कार्यालय - २, राजाराम अपार्टमेंट.
बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), ठाणे - ४०१ १०५

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)